**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५२७/२०२५ निशाणी क्र. ०५ खालील आदेश–</u>**

**(मयुर को. ऑ. सोसा. लि <u>विरुध्द</u> पांडूरंग बेडगे)**

प्रस्तुत अर्जाद्वारे फिर्यादी विनंती केली आहे की, फिर्याद शहाजी तोरसे हे कार्यरत असल्याने त्यांचे नावे दाखल केलेली होती, परंतु सदर फिर्याद दाखल केल्यानंतर शहाजी तारेसे यांनी राजीनामा दिला असल्याने त्यांच्या जागी, पांडुरंग डुबुले यांची फिर्यादी पतसंस्थेने ठराव होवून नेमणुक केलेली असुन, सध्या नवनियुक्त कर्मचारी फिर्यादी पतसंस्थेचे सर्व न्यायालयीन कामकाज पहात आहेत त्यामुळे फिर्यादीचा अधिकारपत्र धारक यांचे कक्षेत शहाजी संजय तोरसे यांचे ऐवजी पांडुरंग डुबुले, वय ५५ वर्षे, धंदा नोकरी, रा. देशिंग, ता कवठेमहांकाळ, जि. सांगली यांची फिर्यादीच्या वतीने अधिकृत इसम म्हणून दुरुस्ती करण्याची परवानगी मागण्यात आली आहे.

२. आरोपीतर्फे सदर अर्जावर म्हणणे दाखल मागविण्यात आले. परंतु आरोपीने म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे अर्ज विनाम्हणणे चालविण्यात आला.

३. अभिलेखाची पाहणी केली. फिर्यादीतर्फे युक्तीवाद ऐकला.

४. सदरचे प्रकरण आरोपीविरुध्द धनादेश अनादराबाबत दाखल केलेले आहे. फिर्यादीमधील कथनानुसार, फिर्यादी पतसंस्थेने, आरोपीस दिलेल्या कर्जाचा रकमेपोटी, आरोपीने दिलेला धनादेश अनादरीत झालेला आहे. सदरचे प्रकरण हे तत्कालीन अधिकारपत्र धारक यांनी फिर्यादी पतसंस्थेच्या वतीने दिलेल्या अधिकारपत्रान्वये दाखल केलेले होते. परंतु आजरोजी त्यांनी राजिनामा असल्याकारणाने, पतसंस्थेने नविन कर्मचा–यास अधिकारपत्र दिलेले आहे. सदरचे

प्रकरण हे फिर्यादी पतसंस्थेशी निगडीत असल्यामुळे पुर्वीच्या अधिकारपत्र धारकाचा, प्रकरणाशी वैयक्तीकरित्या कोणताही संबंध नव्हता. त्यामुळे नवीन अधिकारपत्र धारक हा फिर्यादी पतसंस्थेच्या वतीने दाखल असलेल्या प्रकरणामध्ये पुरावा देवून प्रकरण पुढे चालवू शकतो. फिर्यादी पतसंस्था यांनी पांडुरंग डुबुले यांना पतसंस्थेच्या वतीने प्रकरण चालवण्याबाबतचे अधिकार दिले बाबतचे अधिकारपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. याशिवाय प्रस्तुत अर्जासोबत प्रस्तावित फिर्यादीने शपथपत्र सादर केलेले आहे. सदर शपथपत्रामधील कथने ही अर्जाशी सुसंगत आहेत.

५. प्रस्तुतचे प्रकरण पतसंस्थेच्या कार्यालयीन अखत्यारितीत दाखल केलेले आहे. प्रकरणात अदयाप सुनावणी चालु झालेली नाही. बदलुन येणा–या नवीन अधिकारपत्र धारकाने, प्रकरणामध्ये हजर राहुन तसेच पतसंस्थेचे दस्ताऐवज पडताळणी करुन प्रकरणात पुरावा देणार असुन, आरोपीस उलटतपास घेण्याची व पुरावा देण्याची संधी असल्याने त्यामध्ये आरोपीचे कोणतेही नुकसान होणार नाही. यालउट जर बदलुन आलेल्या नविन शाखा प्रमुखास प्रकरण पुढे चालविण्याची परवानगी दिली नाही तर, प्रकरण विनाकारण प्रलंबित राहण्याची शक्यता आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब पुढील आदेश.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. फिर्यादीस, अधिकारपत्र धारक यांचे कक्षेत शहाजी तोरसे यांचे ऐवजी पांडुरंग डुबुले, वय ५५ वर्षे, धंदा नोकरी, रा. देशिंग, ता. कवठे महांकाळ जि. सांगली अशी दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. फिर्यादीने त्या अनुषंगाने पुढील तारखेपुर्वी दुरुस्ती करुन, फिर्यादीची दुरुस्त प्रत दाखल करावी.

४. अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसावा.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.02.23 11:03:52 +0530

**दिनांक: २१.०२.२०२६** **( एम.ए.कुलकर्णी )**

ठिकाण: कवठेमहांकाळ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

कवठेमहांकाळ

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 21.02.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 21.02.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 21.02.2026 |